


## मेळघाटचे वैभव

# रान पिंगळा

## व इतर घुबडप्रजाती


The owl is the wisest of all birds,
because the more it sees,
the less it talks.
~ African Proverb

मेळघाटचे वैभव

# रान पिंगळा

## व इतर घुबड प्रजाती

Melghat Tiger Reserve,
Amravati, Maharashtra

मेळघाटचे वैभव

# रान पिंगळा

## व इतर घुबड प्रजाती

संकल्पना

श्री. एम.एस. रेड्डी (भा.व.से.)
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प

मार्गदर्शक -

श्री. विशाल माळी
विभागीय वन अधिकारी
मेळघाट व्याघ्र प्रकल्प

माहिती संकलन -

तुषार पवार
वन्यजीव संशोधक

मुखपृष्ठ व टाईपसेटींग-
गिरीश देशमुख

प्रकाशक -
मेळघाट व्याघ्र प्रतिष्ठान
मेळघा व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
फोन : ०७२१-२६६२७९२

E-mail : projecttigermelghat@gmail.com Website : www.magicalmelghat.com

# अनुक्रमणिका –


The Parliament...

# प्रस्तावना



सातपुडा पर्वतरांगात स्थित मेळघाट हा देशातील पहिल्या ९ व्याघ्र प्रकल्पापैकी एक असून क्षेत्रफळाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा व भारतातील तिसरा मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. मोठ- मोठ्या समांतर पर्वत रांगा, उत्तुंग साग वृक्ष, मिश्र वनांचे पट्टे, धबधबे अशी मेळघाटच्या नयन रम्यतेमध्ये भर टाकून सौंदर्य वाढविते.

अशा या मेळघाट मध्ये मोठ्या प्रमाणात जैवविविधता आश्रीत आहे. यात वाघ, गौर, सांबर असे भिमकाय सस्तन प्राणी , सूक्ष्म कीटक, सुंदर फुलपाखरे यांचा समावेश आहे. परंतु याशिवाय मेळघाट अतिशय दुर्मिळ अशा पक्षांसाठी सुध्दा ओळखला जातो.

रान पिंगळा म्हणजेच फॉरेस्ट आउलेट ही नामशेष झालेली घुबडाची जात १०० वर्षांनी मेळघाटात सुखाने नांदत असल्याचे संशोधनानंतर लक्षात आले. मेळघाटात या घुबडाचे अनावधनाने सवंर्धन झाले. वाघ अधिवास वाचला म्हणजे सर्व प्राण्यांचे संवर्धन होते, या विश्वासाला प्रात्यक्षिक दुजोरा मिळाला.

घुबडांविषयी अनेक लोक कथा आणि अंधश्रद्धा आहे. मेळघाटातील घुबडांवर मोठ्या प्रमाणात शास्त्रीय संशोधनाचे काम प्रगती पथावर आहे, परंतु सदर ज्ञानाचे भांडार मराठी मातृभाषेत उपलब्ध नाही. त्यामुळे मेळघाटातील घुबडांची शास्त्रीय माहिती पर्यटकांना, गाईड व विद्यार्थ्यांना सहज सुंदर भाषेत उपलब्ध व्हावी , म्हणून हा एक प्रामाणिक प्रयत्न.


श्रीनिवास रेड्डी

मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.



मेळघाट व्याघ्र प्रकल्प भारतातील पहिल्या ९ घोषीत व्याघ्र प्रकल्पापैकी एक, दि. २२ फेब्रुवारी १९७२ रोजी मेळघाटच्या जंगलाला व्याघ्र प्रकल्प म्हणून दर्जा मिळाला, अन सातपुड्यातल्या जंगलालाल संरक्षण मिळाले. हा महाराष्ट्र राज्यातला पहिला व्याघ्र प्रकल्प, सातपुडा पर्वत रांगेतील हे संरक्षित जंगल म्हणजे विविधतेने नटलेल्या निसर्ग संपन्नतेचा वारसाच. उंच उंच पर्वत रांगा, खोल दर्या, त्याच्यातून वाहणाऱ्या नद्या, कुठे शुल्क पानगळीचे तर कुठे सदाहरीत जंगलाचे पट्टे. मेळघाट चे जंगल हे पशु पक्ष्यांबरोबरच स्थानिक आदिवासी आणि त्यांच्या संस्कृतीसाठी सुद्धा प्रसिद्ध आहे. त्याच बरोबर जंगलात उगम पावणारे अनेक छोटे छोटे नाले अन त्यांचे पुढे नद्यात होणारे रूपांतर, उंचावरून कोसळणारे धबधबे, धुक्यात पहुडलेले चिखलदरा वा माखला म्हणजे जणू मेळघाटाच्या सौंदर्याचे प्रतीकच.

विदर्भातील सर्वात उंच ठिकाण वैराट हे मेळघाटातच आहे. मेळघाटातील जंगल हे वाघांबरोबरच अनेक दुर्मिळ पशु व पक्ष्यांचे आश्रय स्थान आहे. बिबट, अस्वल, खवले मांजर, चांदी अस्वल असे अनेक दुर्मिळ प्राणी मेळघाटात आढळतात. मेळघाटाचे संरक्षित जंगल हे २७६८ कि.मी. क्षेत्रफळा मध्ये पसरले आहे. हे प्रामुख्याने सागाचे असून त्याच्यात इतर वृक्ष पण आढळतात, ज्यात हळदू, अर्जुन, पळस, सालई, अमलतास, साजड व मोह अशी वृक्ष प्रामुख्याने आढळून येतात. मेळघाट हे पक्षासाठी तर नंदनवनच आहे. आत्ता पर्यंत मेळघाटात २९४ पक्ष्यांची नोंद झाली आहे. यात मलबार कवड्या धनेश सारखी अनेक दुर्मिळ पक्षी आढळून येतात त्यातीलच म्हणजे रान पिंगळा हा सुद्धा मेळघाटात आढळून येतो. ज्याच्या बद्दल माहिति आपण जाणून घेणार आहोत.




## थोडसं घुबडांविषयी....

घुबड म्हटल्यावर लोकांच्या मनात अनेक शंका आणि भीती आजही दिसून येते व त्यामुळेच आज ह्या सुंदर पक्ष्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ह्या पक्ष्याबद्दल गैरसमज होण्याचे मुख्य कारण म्हणजे, हे निशाचर असून त्यानुसार त्यांनी आपले शरीर आणि डोळे विकसीत केले आहे. त्याचे रूप व आवाजामुळे समाजात त्यांच्याविषयी बरेच कुतुहल आहे. दरवर्षी शेकडो घुबड ही काळ्या बाजरात पकडून विकली जात आहेत, त्यामुळे तर काही घुबडांच्या प्रजाती ह्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

घुबडांचे नैसर्गिक परिसंस्थेत एक महत्वाचे स्थान आहे. ते अन्न साखळीत सर्वात वरच्या स्तरावर आहेत ज्यामुळे ती परिसंस्था संतुलीत राहते. जर घुबड नष्ट झालीत किंवा त्यांची संख्या कमी झाली तर अन्नसाखळीचे संतुलन बिघडेल व त्याचे विपरीत परिणाम निसर्गाच्या इतर घटकांवर पण होईल. घुबड हे फक्त अन्नसाखळीचा एक भाग नसून मानवीय जीवनाशी पण त्यांचा जवळचा संबंध आहे. घुबडाला शेतकऱ्यांचा मित्र म्हटले जाते कारण घुबडांचे मुख्य अन्न हे उंदीर वर्गीय प्राणी आहेत. शेत पिकांचे नुकसान करणाऱ्या उपद्रवी उंदरावर व त्याच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याचे काम हे घुबड करते म्हणून त्याला शेतकऱ्यांचा मित्र पण संबोधले जाते. आज ही पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी आपल्या शेतात रात्री घुबडांना बसण्यासाठी ङ्गढङ्ग आकाराचे लाकूड गाडून ठेवतात जेणेकरून पिकांत घुबडांना बसता येईल व ते उंदरांना खाऊन पिकांचे संरक्षण करतील.

भारतीय संस्कृतीत पण घुबडांचे अनन्य महत्व आहे. आई लक्ष्मीचे वाहन म्हणून भारतात घुबडांची पुजा केली जाते व त्यांना वैभवाचे प्रतिक मानले जाते. भारतीय संस्कृती प्रमाणेच जगातल्या इतर संस्कृतीत पण घुबडांना खुप महत्व दिले गेले आहे. ग्रीक व रोमन संस्कृतीत तिथले सैनिक लढाईला जाताना घुबडांचे चिन्ह बरोबर बाळगत असत, ते घुबडाला विजयाचे प्रतिक मानत. त्याचप्रमाणे रान पिंगळा ह्या अति दुर्मिळ घुबडाचे वर्गीकरणात Athene हे ग्रीक देवतेचे नाव देण्यात आले होते, Athene ही ग्रीकांची goddess of wisdom आहे.


देवी लक्ष्मी


ग्रीक देवता : अथेणी

तसेच, इंडो-अमेरिकन संस्कृतीतील वेगवेगळ्या जातीच्या घुबडांशी खूप जवळचे संबध होते ते घुबडांचे चित्र हे खडकावर कोरून ठेवत असत, त्यांची धारणा होती की घुबड ही आपले पाण्याच्या राक्षसान पासून (Water Demon) पासून रक्षण करतो. अमेरिकेतील डकोटा ही दास्ता (Dakota Hidasta) हे बिळात राहणाऱ्या घुबडांना (Burrowing Owl) लढाऊ सैनिकांचे शक्तीचे प्रतीक मानत, लिनापे (Lenape) संस्कृतीतील लोक घुबडाला मानवाच्या संरक्षणाचे प्रतीक मानत. टिंजीट (Tingit) लोक हे घुबडाला आत्मविश्वासाचे प्रतीक मानत. ते लढाईत घुबडांचे चिन्ह वापरत ज्यामुळे शत्रुत भीती निर्माण होत असे, अशी त्यांची धारणा होत असे. घुबडांचा आणि मानवाचा खुप काळापासून जवळचा संबंध राहीला आहे. एकाच परिसंस्थेत राहणारे हे दोघ प्रमुख घटक आहेत.


ग्रीकांचे नाणे


कंबोडियन नदीच्या खडकावर काढलेले चित्र


ग्रीक राजा आणि त्याचे नाणे

पण आज मानवच त्यांचा शत्रू होऊन गेला आहे, अंधविश्वासामुळे त्यांची होणारी चोरटी शिकार व काळ्याबाजारात होणारी छुपी तस्करी, गैर-समजामुळे त्यांच्या घरट्योंचे होणारे उद्धीवस्तकरण त्याच बरोबर लोकांकडून होणारी बेसुमार जंगल तोड, रासायनिक खतांचा बेसुमार वापर वन वनवा ह्या सगळ्यामुळे आज घुबडांचे व त्याच्या आदिवासाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. परिणामी आज घुकबडांच्या बराचश्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आज त्याच्या व त्यांच्या आदिवासाच्या संरक्षणाची व संवर्धनाची गरज आहे. तसेच लोकांच्या मनात असलेले घुबडांबद्दलचे गैरसमज आणि अंधविश्वास नष्ट करण्याची गरज आहे, त्यासाठी समाजात जनजागृतीची गरज असून घुबड हा एक पक्षी आहे व तो मानवाचा मित्र आहे, हे लोकांच्या मनात बिंबविण्याची गरज आहे.






# Owlets

## मेळघाटातील लहान घुबडं

मराठी नाव : **रानपिंगळा**
स्थानिक नांव : डूडा / डोंगर डूडा
शास्त्रीय नांव : Heteroglaux blewitti (हेटेरेग्लोक्ष ब्लुइटी)
इंग्लिश : Forest Owlet (फॉरेस्ट औलेट)



## Forest Owlet

**वर्गीकरण (Classification)**

| | | |
|---|---|---|
| **Kingdom** | : | Animalia |
| **Phylum** | : | Chordata |
| **Class** | : | Aves |
| **Order** | : | Stringiformes |
| **Family** | : | Strigidae |

**सध्यस्थिती :**

हा पक्षी महाराष्ट्र राज्यात व मध्य प्रदेशातील काही भागात खुप मोठ्या प्रमाणात आढळतो. प्रामुख्याने सातपुड्यातील तोरणमाळ, तळोदा या भागातील राखीव वनांमध्ये तसेच जळगांव जिल्ह्यातील यावल अभयारण्यात पण त्याचे अस्तित्व होते पण आता विविध कारणास्तव तो दिसेनासा झाला आहे. अलीकडेच पक्षी अभ्यासकांच्या एका टीमने याचा शोध घेतला असता तो नंदुरबार जिल्ह्यात व मेळघाट अभयारण्यात केवळ २०० ते ३०० एवढ्याच संख्येने आढळला.

जगभरात फक्त सातपुडा पर्वत रांगे मध्ये अस्तित्व असलेला हा पक्षी पश्चिम घाटातील तानसा अभयारण्यात दिसून आला, हि आनंदाची बातमी आहे. खणउछ नुसार रानपिंगळा याला शपवरपसशीशव म्हणजेच नष्ट होण्याच्या मार्गावरील प्रजाती मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

## अन् रान पिंगळा असा पुन्हा जगासमोर आला :

| वर्ष | संशोधक | कार्य |
|---|---|---|
| १८७२ | ब्लेवीट | सर्वप्रथम शोधून काढले |
| १४ डिसें. १८७२ | ए. ओ. ह्युम | विश्लेषण आणि वर्गीकरण केले |
| १८७७ | बेल | सबलपुर, ओरिसा येथून नमूना मिळविला |
| १८८०-८३ | जेम्स, डेव्हिडसन | खांदेशातुन चार नमुने मिळविले |
| १९१४ | कर्नल रिचर्डसन | यांनी गुजरात मधील मांडवी भागातून नमुना गोळा केल्याचा दावा केला. पण ते नमुने हे जेम्स डेव्हिडसन यांनी खांदेशातुन गोळा केलेले व नॅचरल हिस्ट्री म्युझियम ऑफ लंडन येथून चोरी झाल्याचे सिद्ध झाले. |
| **म्हणजे १८८३ नंतर शतकभर रानपिंगळा हा कुणालाच दिसला नाही** | | |
| १९६४ | ग्रेसना व हेमलेट | यांनी त्याला दुर्मिळ म्हणून संबोधले |
| | डॉ. सलीम आली व एस. धिल्लन | यांनी खानदेश आणि सातपुड्यातील जंगलात व मेळघाटात पण शोधण्याचा प्रयत्न केला पण त्यांना आढळून आले नाही. |
| १३ ते २७ नोव्हें. १९९७ | बेन किंग, पामेला रायमुसेन, डेव्हिओवेट | यांनी मध्य प्रदेश, ओरिसा व सातपुड्यात शोध मोहीम आखली, २५ नोव्हेंबर १९९७ ला नंदुरबार जिल्ह्यात पुन्हा रान पिंगळा सापडला. अन १०० वर्ष अज्ञातवासात गेलेला रानपिंगळा जगासमोर आला. |

अलीकडच्या काळात अनेक लोकांनी वेगवेगळ्या भागात त्याच्या अस्तित्वाचे पुरावे दिले आहेत, त्यानुसार मेळघाट, मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यात, नंदुरबार, तोरणमाळ, शहादा व पश्चिम घाटात असलेल्या तानसा अभयारण्यात पण तो सापडल्याचे अलीकडे पुरावे आहेत तसेच नाशिक जवळ पण रान पिंगळा असल्याचे सांगण्यात येत आहे.

## रान पिंगळा कसा ओळखावा ?

सरासरी २३ सेमी लांबी असलेला, रान पिंगळा याची छाती पांढरी असून त्यावर कथ्था रंगाचे आडवे पट्टे तसेच कपाळावर धूसर ठिपके असतात. रान पिंगळ्याचा रंग हा वाळलेल्या सागाच्या झाडाशी मिळता जुळता असल्या कारणाने त्याला कधी कधी शोधणे अवघड असते.



**खाद्य :**

रान पिंगळ्याचे मुख्य खाद्य हे लहान सस्तन प्राणी असून त्याच्यात प्रामुख्याने उंदीर वर्गीय प्राण्यांचा समावेश होतो. तसेच पाली आणि इतर किटकांचा पण त्याच्या खाद्यात समावेश होतो.




**प्रजनन :**

रान पिंगळा ह्या पक्षाच्या विणीचा हंगाम हा ऑक्टोबर ते मार्च आहे. साधारणत: ३० दिवसात मादी १ ते ४ अंडे देते. ह्या काळात मादी घरट्यातच असते. नर, मादीला खाद्य आणून देतो. पिल अंड्यातून बाहेर आल्यावर नर आणि मादी मिळून पिलांची संगोपण करतात. साधारण ६० ते ७० दिवसांनी पिल मोठी होऊन उडण्यास सुरूवात करतात.



**घरटे :**

रान पिंगळा, ह्या घुबडाचे घरटे नेहमी सागाच्या झाडावर आढळून आले आहे. साधारण जमीनीपासुन २० मी. उंची वर सागवानाच्या खोडात अंडाकृती आकाराचे घरटे असते. रान पिंगळा स्वत: घरटे बनवत नसून दुसऱ्या पक्षांनी बनवलेल्या घरट्यात ते विन घालतात. प्रामुख्याने सुतारपक्षी आणि पोपट ह्या पक्षांची घरटी ते वापरतात, घरट्यावरून त्यांच्यात कधी कधी भांडण ही होतात.



**रान पिंगळा बघण्याची योग्य वेळ :**

रान पिंगळा हा जरी दिवसा दिसणारा घुबड असला तरी दिवसभरात तो फक्त सकाळी ( साधारणत: स.६ ते १० आणि सायं. ४ ते ६ ) या वेळीच जास्त कार्यशील असतो, दुपारच्या वेळेस तो इतका कार्यशील नसतो. उन्ह वाढल्यावर झाडाच्या फांदीच्या आडोश्याला असतो.



## रान पिंगळा कुठे दिसू शकतो.

वरील सांगितल्याप्रमाणे रान पिंगळ्याचे खाद्यात मुख्यत्वे करून कीटक व लहान सस्तन प्राणी यांचा समावेश असतो. खाद्य जीथे उपलब्ध असते तिथे तो आपली जागा निश्चित करतो. मुख्यत्वे करून शेतीच्या कडेने असलेल्या जंगलात रान पिंगळा आढळून येतो परंतु दाट जंगलात पण त्याचे वास्तव्य असते. जिथे कीटक आणि त्याला आवश्यक खाद्याची कमतरता नसेल, भरपूर गवत असलेल्या भागात जेणे करून कीटक आणि उंदीर वर्गीय प्राण्याचे वास्तव्य असते आणि सागाची वृक्ष हे रान पिंगळ्यासाठी आवश्यक गोष्ट आहे.



उन्हाळ्यातील रानपिंगळा




हिवाळ्यातील रानपिंगळा

## रान पिंगळा कसा शोधावा ? :

साधारण वरील सांगीतलेल्या वेळेत जर जंगलात गेले तर पहिले नजरेने त्याला शोधावे, रान पिंगळा हा त्या वेळेत नेहमी झाडाच्या उंचावर बसलेला दिसून येईल. उन्हाळ्यात त्याचे दर्शन लवकरच होते. कारण सागाच्या झाडांची पाने ही गळून गेलेली असतात. खुरट्या झाडांवर तो दुरवरून लगेच दिसून येतो. परंतु हिवाळ्यात थोडे शोधावे लागते. जर तो नजरेत दिसला नाही तर त्याला शोधण्याची आणखी एक पद्धत म्हणजे त्याचे त्याच्या आवाजाचे प्रसारण करणे . रान पिंगळा हा आपली जागा राखून ठेवतो. त्यासाठी तो वेगवेगळे आवाज काढून आपले अस्तित्व घुसखोरांना दाखवून देतो. साधारणपणे रान पिंगळा हा तीन प्रकारचे आवाज काढतो १) संपर्क आवाज, कुहुउ कुहुऊ रान पिंगळाचा हा आवाज जंगलात नेहमी ऐकू येतो तो हा आवाज दुसऱ्या रान पिंगळ्याशी संपर्कासाठी वापरतात. २) अधिकार क्षेत्र आवाज क्यॉंऊ क्यॉंऊ हा आवाज घुसखोरी करण्यासाठी आपले अस्तित्व असल्याचे जाणवण्यासाठी काढतात. ३) शीईए हा आवाज पिल्लांशी संपर्कासाठी काढतात.

## धोका आणि संवर्धन :

तसेच रान पिंगळा हा दिवसा संचार करणारे घुबड असल्या कारणाने त्याचे नैसर्गीक शत्रु पण खुप असतात, शिकारी वर्गातील सर्व पक्षी हे रान पिंगळ्याचे शत्रू आहेत प्रामुख्याने शिकरा हा शिकारी पक्षी जणू त्यांचा कर्दनकाळच आहे. त्याच प्रमाणे सर्प गरूड, तुरेवाला सर्प गरूड, कोतेवाल हे पक्षी पण रान पिंगळ्याचे नैसर्गीक शत्रू आहेत. परंतु आज ह्या प्रजातील सर्वात मोठे धोखा जर असेल तर तो मानवांकडून, बेशुमार जंगल तोड, रासायनिक खतांचा वापर, वन वनवा ह्यामुळे आज रान पिंगळ्याचे अधिवास नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.



शिक्रा




तुरेंवाला सर्पगरूड



तुरेंवाला गरूड



रानपिंगळा



ठिपकेवाला पिंगळा




वन पिंगळा

रानपिंगळ्याच्या आदिवासात त्याच्याशी साम्य असलेले आणखी दोन घुबडं मिळतात. बऱ्याचदा त्यांची रानपिंगळा म्हणून लोक गफलत करतात.









# Spotted Owlet

शास्त्रीय नांव : *Athene bramha*


लांबी : ४८ से.मी.



## 2 ठिपकेवाले घुबड

हया घुबडाचा रंग करडा तपकिरी असून त्यावर पांढरे ठिपके असतात म्हणून या घुबडाला ठिपके वाला घुबड पण म्हणतात. ह्याच्या पंखावर, पाठीवर तसेच चेहऱ्यावर पण पांढरे ठिपके असतात. चेहरा फिक्कट रंगाचा असून गळा पण फिक्कट रंगाचा असतो. हे घुबड सकाळी आणि सायंकाळी क्रियाशिल असते. याचा आवाज किंचाळलेल्या सारखा येतो, हे घुबड गावाच्या आजुबाजुला तसेच जंगलात आढळते. याचे मुख्य अन्न हे कीटक, कधी कधी छोटे पक्षी, छोटे उंदीर, पाली तसेच सरडे वगैरे आहे, साधारण  नोव्हेंबर ते मार्च एप्रिल हा काळ पिंगळा पक्ष्यांचा विणीचा काळ असून त्याचे घरटे झाडाच्या डोलीत, जुन्या इमारतीच्या छिद्रात , कडे कपारीत, कधी हे दुसऱ्या पक्षांनी सोडून दिलेल्या घरट्यात पण विन घालते. मादी एके वेळेस ३ ते ४ पांढऱ्या रंगाची अंडी देते. अंडी उबवण्यापासून पिल्लांच्या संगोपनापर्यंत सर्व कामे  नर मादी मिळून करतात.


हया घुबडाची नेहमी रान पिंगळा म्हणून कधी कधी तफावत होते, पण हा रान पिंगळा नसून ठिपके वाला पिंगळा आहे.





# Jungle Owlet

शास्त्रीय नांव : *Glaucidium radiatum*
लांबी : २० से.मी.








## 3 जंगल पिंगळा

ही लहान साळुंकि च्या आकारीची घुबड प्रजाती आहे. गोल डोके आणि त्यावर व शरीरावर बारीक पट्टे असतात. चेहऱ्याची डिस्क स्पष्ट नसते, रंग तपकिरी असून शेपूट अखंड असते ती थोडी पांढऱ्या रंगाची असून त्यावर पण बारीक पट्टे असतात. विणीच्या हंगामात ह्याचा रंग गडद काळपट तपकिरी होतो व पट्टे स्पष्ट पण बारीक असतात. पंखावर अस्पष्ट पांढरे आणि रूफस पट्टे असतात. हे घुबड गवताळ आणि झुडपी जंगलात वास्तव्याला असते, तसेच पानगळीच्या आणि दमट पान गळीच्या जंगलात प्रामुख्याने सापडते. हे घुबड पहाटेच्या वेळेस आणि सायंकाळी सुर्यास्ताला जास्त कार्यशिल असते. पण दिवसा पण त्याचे आवाज जंगलात ऐकू येतात आणि कधी कधी हे दिवसा पण क्रियाशिल असते.

याचा विणीचा हंगाम हा मार्च ते मे या काळात असतो. मादी झाडाच्या डोलीत घरटी करतात, साधारण एका वेळेस सरासरी चार अंडी देते. मेळघाटात ह्या घुबडांची संख्या बऱ्यापैकी आहे. सर्व भागामध्ये या घुबडाचा आवाज आपणांस ऐकू येतो.

Extinct | Threatened | Least Concern

EX EW CR EN VU NT **LC**

# Owl

# मेळघाटातील
# मोठे घुबडं





# Eurasian Eagle Owl

शास्त्रीय नांव : *Bubo bubo*

लांबी : ७५ से.मी.





## 4 श्रुन्घी घुबड

श्रुन्घी घुबड हे घुबडाच्या पंखांचे आकारमान ७५ ते ८० से.मी. पर्यंत असू शकते, ह्या घुबडाच्या कानावर काहीसे शिंग सारखे पीस असतात, म्हणून त्याला श्रुन्घी घुबड म्हणतात. रंगाने वरचा भाग गडद काळा रंग आणि पिवळसर तपकिरी असतो. चेहऱ्याची डिस्क पूर्ण पाने विकसित नाही, डोळे संत्र्या सारखे असतात. हे घुबड बहुदा गावाच्या अन शेताचे कडेला वास्तव्याला असते तसेच जंगलें, डोंगराळ भागात पण वास्तव्याला असते तसेच जंगले, डोंगराळ भागात पण वास्तव्याला असते तसेच जंगले, डोंगराळ भागात पण वास्तव्याला असते, हे रात्री क्रियाशिल असलेले शिकारी घुबड आहे.

याचे मुख्यत्वे अन्न म्हणजे  लहान सस्तन प्राणी, पक्षी, , सरपटणारे तसेच बेडूक आणि मोठे किटक ही खाते, ह्या घुबडाची घरटी डोंगराच्या कपारीत असतात, ह्याचा विणीचा हंगाम म्हणजे मादी एका वेळेस सरासरी दोन अंडी देते. अंडी मादी उबवते ह्या काळात नर तिला अन्न भरावण्याचे काम करतो, पिल आंद्यातून बाहेर आल्यावर नर आणि मादी मिळून पिल्लांचे संगोपन करतात, साधारण ५ महिनांनी पिल उडण्यालायक होतात. मेळघाटात ही घुबड सर्व भागांमध्ये आढळून येते.

Extinct | Threatened | Least Concern

EX EW CR EN VU NT **LC**





# Mottled Wood Owl

शास्त्रीय नांव : *Strix ocellata*

लांबी : ४८ से.मी.






## 5 चट्टेरी घुबड

हे भारतात सापडणाऱ्या मोठ्या घुबडांच्या प्रजातीतील एक प्रजाती आहे. लालसर तपकिरी रंगाचे असून चेहेऱ्यावर काळ्या आणि पांढऱ्या रंगाचे वर्तुळाकार पट्टे असतात. डोळ्यांच्या कडा ह्या ऑरेंज रंगाच्या असतात. याच्या अंगावर झाडाशी मिळते जुळते असे पट्टे असतात. त्यामुळे तो परिसराशी एकरूप होऊन जातो त्यामुळे त्याला शोधणे कधी कधी अवघड असते. पण हे घुबड त्याच्या विशिष्ट आवाजासाठी प्रसिद्ध आहे. सायंकाळी सूर्यास्तानंतर ह्या घुबडाचा आवाज आपण जंगलात ऐकू शकतो, ह्याच्या आवाज हा थोडा भीती दायक असतो. हे घुबड गवताळ प्रदेशांसहित झाडोऱ्याच्या जंगलात आढळते.

जुनी मोठी झाड किंवा जुन्या उद्यानात हि वास्तव्याला असतात, ही मेळघाटच्या जंगलात सर्वत्र आढळून येतात. ह्या घुबडाचा विणीचा हंगाम हा फेब्रुवारी ते मार्च आहे. झाडाच्या डोलीत हि आपली घरटी बनवतात. मादी एका वेळेस सरासरी एक ते दोन पांढऱ्या रंगाची अंडी देते. ह्याचे मुख्य अन्न म्हणजे खार, उंदीर तसेच छोटे सस्तन प्राणी आहे.





# Common Barn Owl

शास्त्रीय नांव : *Tyto alba*
लांबी : ३३ ते ३९ से.मी.








## 6 गव्हाणी घुबड

हे अतिशय देखन घुबड असून ध्रुवीय आणि काही वाळवंटीय प्रदेश सोडता ही जवळपास जगाच्या सर्वच भागात हे घुबड आढळते. हे कावळ्याच्या आकाराची घुबड असून हृदयाच्या आकाराचे पांढरा चेहरा हा ह्या घुबडाचे वैशिष्ट आहे. पंखाचा आणि पाठीवरचा भाग हा तपकिरी रंगाचा असून पोटाकडचा भाग हा पांढरा असतो त्यावर काळे ठिपके स्पष्ट दिसतात. ही घुबड पुर्णपणे निशाचर असून दिवस भर झाडाच्या डोलीत वास्तव्याला असते. ह्या घुबडाचे प्रमुख वैशिष्ट म्हणजे हे एकदा साथीदार निवडल्यावर आयुष्यभर आपला साथीदार बदलत नाही. ह्या पक्षाची विन वर्षभरात कधी पण असू शकते, ती एका वेळेस सरासरीने चार अंडी देते. ही जुन्या झाडाच्या डोलीत, जुन्या इमारतीमध्ये तसेच डोंगराच्या कपारीत आपले घरटे बनवते.

अंडी उबवण्याचे काम प्रामुख्याने मादी करते. ह्या काळात नर तिच्यासाठी व नंतर पिल्लांसाठी पण अन्न भरवण्याचे काम करतो. यांचे मुख्य खाद्य म्हणजे उंदीर व दुसरे लहान प्राणी जसे सरडे, पाली तसेच उभयचर वर्गातील इतर प्राणी, लहान पक्षी व कीटक असतात. हि घुबड मेळघाटात सर्वत्र आढळून येते.

Extinct | Threatened | Least Concern

EX EW CR EN VU NT LC





# Brown Fish Owl

शास्त्रीय नांव : *Ketupa zeylonensis*

लांबी : ४९ ते ५६ से.मी.







## 7 मासेमार घुबड

हे घुबड मोठ्या घुबडांच्या प्रजातीतील एक प्रजाती आहे. कानावरचे पीस मोकळी आणि मोठी असतात जे कानाच्या बाजूला थोडी झुकलेली असतात. ह्या घुबडाच्या अंगावर वरच्या भाग तपकिरी रंगाचा असून त्यावर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या रंगाचे पट्टे असतात. पोटाकडचा भाग हा पांढऱ्या व फिक्कट तपकिरी रंगाचा असून त्यावर गडद तपकिरी रंगाच्या रेषा असतात. गळ्यावर पांढऱ्या रंगाचा फुगवटा असतो, डोळे पिवळसर रंगाचे असून नर मादी सरासरीने सारखेच दिसतात. हे घुबड निशाचर असून कधी कधी दिवसा पण कार्यशिल असतात. दिवसा ह्या पक्षाला दुसरे छोटे पक्षी त्रास देतात, ढगाळ वातावरण असल्यास तो दिवस भर कार्यशील असल्याचे आढळून आले आहे. हे घुबड नेहमी नदी, नाले किंवा तलावाच्या काठावर वास्तव्याला असते. याचे मुख्य अन्न हे मासे आहे. नदीच्या काठावरील झाडांवर किंवा खडकावर हे बसून असते अणि पाण्यात मासे दिसल्यावर अत्यंत चलाखीने पाण्यावरून उडून ते आपल्या धारधार नख्यात माश्यांना पकडते. माश्यांन बरोबरच हे घुबड बेडूक, खेकडा आणि इतर पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांचा फडशा पडतो.

ह्या घुबडाचा विणीचा हंगाम हा नोव्हेंबर ते एप्रिल असून एक वेळेस मादी एक किंवा दोन अंडी देते. ३८ दिवसांनी पिल्ल अंड्यातून बाहेर येतात आणि सरासरीने सात हप्त्यांनी पिल्ल उडण्यालायक होतात. ह्याचे घरटे हे जुन्या आंब्याच्या व वडाच्या डोलीत पण असल्याचे आढळून आले आहे. मेळघाटात ह्या घुबडाला आपण नदीच्या काठावर आणि नाल्यांमध्ये बघु शकतात, तसेच मध्य रात्री त्यांचा आवाज ही ऐकू येऊ शकतो.

Extinct | Threatened | Least Concern

EX | EW | CR | EN | VU | NT | LC




## Eurasian Scops Owl

शास्त्रीय नांव : *Otus scops*

लांबी : १९ ते २१ से.मी.






# 8 युरेशियन स्कॉप्स आउल

स्कॉप्स घुबडांच्या गटातील हे घुबडाचे वैशिष्ट्ये म्हणजे लांब पंख शरीराच्या मानाने लहान शेपूट, कानावरील उभे पीस, चेहऱ्याचा रंग किंचीत तपकिरी, डोळे पिवळे, पोटा कडचा भाग हा राखाडी रंगाचा असून पंख गर्द आणि काही फिक्कट रंगाचे असतात. हे पूर्णतः निशाचर घुबड असून सूर्यास्त नंतर मध्य रात्री पर्यंत क्रियाशिल असते, दिवस भर कड्या कपारीत आणि झाडाच्या डोलीत विसाव्याला असते. ह्या घुबडाचा विणीचा हंगाम हा एप्रिल ते मे असून मादी एका वेळेस ३ ते ४ अंडी घालते. अंड्यातून २० ते ३१ दिवसात पिल बाहेर येतात. ह्या काळात मादी घरट्यातच असते नर अन्न पुरवण्याचे काम करतो, सरासरी ३३ दिवसांनी पिल उडण्यालायक होतात.

ह्या घुबडाचे घरटे हे झाडाच्या डोलीत, डोंगराच्या कपारीत किंवा सुतार पक्ष्यांनी सोडून दिलेल्या घरट्यात ते विन घालतात. हे घुबड शेताच्या कडेला, दाट जंगलात किंवा खडकाळ प्रदेशात आढळून येते, याचे मुख्य खाद्य हे कीटक वर्गीय प्राणी असतात, उदा. नाकतोडे, पाकोळी, सिकाडा, कोळी, गांडूळ असून लहान सस्तन प्राण्यांचे पण त्याच्या आहारात समावेश होतो.






## Indian Scops Owl

शास्त्रीय नांव : *Otus bakkamoena*

लांबी : २० ते २२ से.मी.








# 9 इंडीयन स्कॉप्स आऊल

हे घुबड मैनेच्या आकाराचे लहान घुबड असून, याच्या अंगावर राखाडी पिवळसर रेखीव अधिकच्या आकाराच्या रेषा असतात. याच्या पायावर पण पिसे असतात. कानावर तुरा असून कान उभे करतो तेव्हा शिंगे ठळक दिसतात. डोके गोलाकार असून डोळे मोठे व रंगाने काळे व तपकिरी असतात व भोवताली कानापासून खाली फिक्कट लालसर तपकिरी अर्ध वर्तुळाकार बशी दोन्ही बाजुनी असते.

याचे घरटे झाडाच्या डोलीत असते, हे पुर्णत: निशाचर असून सुर्यास्तानंतर मध्य रात्री पर्यंत क्रियाशील असते. मादी विणीच्या काळात पांढऱ्या रंगाची ३ ते ४ अंडी घालते. याचे मुख्य अन्न हे कीटक असून त्याच्या नाकतोडे तसेच पाली, सरडे व उंदीर त्याच्या आहारात समावेश होतो. हे घुबड मेळघाटात सर्वत्र आढळून येते.






# Oriental Scops Owl

शास्त्रीय नांव : *Otus sunia*

लांबी : १९ से.मी.







## 10 ओरियंटल स्कॉप्स आउल

हे लहान आकाराच्या प्रजातीतील घुबड असून, ह्या घुबडाचे डोळे पिवळे व पाणीदार वर्तुळ असते. कानावरचे पीस हे नेहमी वरती नसतात. मानेवरती काळ्या व पांढऱ्या रंगाचा पट्टा असतो. चेहऱ्यावर पांढुरके दाग असतात आणि कडा काळ्या रंगाची असते, पंख आणि शेपटी वरती गर्द आणि फिक्कट गुलाबी पट्टे असतात. हे पुर्णतः निशाचर घुबड असून सूर्यास्त नंतर क्रियाशील होते. ह्याच्या खाद्यात प्रामुख्याने कीटक , कोळी वर्गीय प्राणी तसेच इतर लहान सस्तन प्राण्यांचा समावेश होतो.

ह्याचा विणीचा हंगाम फेब्रुवारी ते मे असून नर घरटे असलेल्या भागातून आवाज काढून मादीला आकर्षित करतो. मादी एका वेळेस झाडाच्या डोलीत ३ ते ४ पांढऱ्या रंगाचे अंडी देते, अंडी उबवन्याच्या काळात नर मादीला अन्न पुरवतो.

Extinct | Threatened | Least Concern

EX EW CR EN VU NT **LC**




# Collared Scope Owl

शास्त्रीय नांव : *Otus letia*

लांबी : २३ ते २५ से.मी.






## 11 कॉलर स्कॉप्स आउल

हे लहान आकाराचे घुबड असून चेहरा पिंगट पिवळा व त्यावर वर्तुळाकार पट्ट्या असतात, डोळे गर्द तपकिरी असतात. कानावर शिंगासारखे पिस असतात. शरीराचा वरचा भाग हा राखाडी तपकिरी असून त्यावर काळे व राखाडी रंगाचे पट्टे आणि ठिपके असतात. पंखावरती अस्पष्ट पट्टे असून मानेच्या मागच्या भागावर दोन पट्ट्या असतात. शरीराच्या खालचा बाजुला फिक्कट तपकिरी असतो, त्यावरती बाणाच्या आकाराचे ठिपके असतात.

हे पूर्ण पणे निशाचर असून, दिवसा झाडाच्या फांदी वरती स्तब्ध बसून असते. ह्याचे मुख्य अन्न हे कीटक असून त्यात नाकतोडे व इतर कीटकांचा समावेश होतो. त्याच बरोबर सरडे, उंदीर, व पाली पण त्याच्या आहारात समावेश होतो. ह्याचे घरटे हे झाडाच्या डोलीत किंवा सुतार पक्ष्याच्या सोडून दिलेल्या घरट्यात असते. ह्या घुबडाचा विणीचा हंगाम हा फेब्रुवारी ते मे असून, मादी एका वेळेस सरासरीने ३ ते ४ अंडी देते. पिल्लांचे संगोपन नर व मादी दोघे मिळून करतात.




# Brown Hawk Owl

शास्त्रीय नांव : *Ninox scutulata*

लांबी : २७ ते ३३ से.मी.








## 12 तपकिरी शिक्रा घुबड

हे घुबड ससाणाच्या आकाराचे असून याचे शरीर पण त्याच्या सारखेच असते, त्याचे डोळे छोटे गोल आकाराचे असून शरीर बारीक व शेपटी थोडी लांब असते. शरीराचा वरचा भाग तपकिरी रंगाचा असून खांद्याजवळ पांढऱ्या रंगाचे चट्टे दिसतात, डोके राखाडी रंगाचे असून चोचीवरचा दोन्ही डोळ्यांमधला भाग पांढरा असतो याचा खालच्या भागात जाड फिक्कट तपकिरी रंगाच्या उभ्या व आडव्या धारा व गोल ठिपके असतात. हे घुबड मेळघाटात सर्व कडे आढळतात.

हे निशाचर असून ते सूर्यास्तानंतर ते मध्य रात्रीपर्यंत कार्यशील असते. जर ढगाळ वातावरण असेल तर कधी कधी हे दिवसा ही दिसते. याचे मुख्य अन्न हे बेडूक, सरडा, पाली, लहान पक्षी व उंदीर आहे. याचा विणीचा हंगाम मे ते जुलै असून, ह्या काळात दोन्ही आवाज देत असतात. मुख्यत्वे करून जेव्हा पूर्ण चंद्र असतो, हे घरटी झाडाच्या डोलीत करतात. मादी एका वेळेस सरासरीने दोन पाढंऱ्या रंगाची अंडी देते, अंडी उबवन्याचे काम हे मादी करते हया काळात नर तिला अन्न पुरवितो २४ ते २७ दिवसांत पिल्लं अंड्यातून बाहेर येतात.






## Short Eared Owl

शास्त्रीय नांव : *Asio flammaus*
लांबी : ३३ ते ४३ से.मी.





# 13 आखुड कानी घुबड

हे घुबड कावळ्या पेळा मोठे असून हिवाळ्यामध्ये आपल्या भागात स्थलांतर करून येते, हे धुबड गवताळ माळरानतच बहुदा आढळून येते, हे सकाळी आणि सायंकाळी क्रियाशील असते, ह्याच आकालात ते शिकार करते. याचे डोके मोठे गोल असून डोळे पिवळे व भोवताली काळसर असतात. चेहऱ्यावर स्पष्ट-अस्पष्ट अशी भुरकट बशी असते. पंखावरील भाग पूर्ण भुरकट असतो व त्यावर जाड काळसर ठिपके असतात, छातीपासुन खालचा भागावर फिक्कट अशा रेषा असतात. याचे पंख गोलाकार व शेपूट लांब असते हे घुबड मेळघाटात गवताळ भागात दिसून येते.

ह्या घुबडाचे मुख्य अन्न हे उंदीर चिंचुद्री, खार असून कधी कधी ससा चे पण शिकार करते, ही घुबड वशातून दोन वेळेस विन घालेते मादी एकवेळेस सरासरीने ५ ते ७ अंडी घालते याचे घरटे हे बहुदा उंच गवतात जमिनी वर असते. मादी अंडी उबवण्याचे काम करते ह्या काळात नर अन्न भरवण्याचे काम करतो.

Extinct — Threatened — Least Concern

EX EW CR EN VU NT **LC**




# Dusky Eagle Owl

शास्त्रीय नांव : *Bubo coromandus*

लांबी : ४८ ते ५३ से.मी.






## 14 काळसर श्रृंगी घुबड

हे घुबड आकाराने मोठे असून गरूडा प्रमाणे दिसते, याचा रंग राखाडी असून वरचा भागात काळसर रंगाची छटा असते, खालच्या किंवा छातीचा भाग राखाडी फिक्कट काळसर असून उभ्या आऱ्या असतात. शेपटीकडील भाग गडद राखाडी असून त्यावर तांबूस रंग असतो व शेपूट पंखाच्या समांतर असते. याचा चेहरा मोठा गोल असून कानावर मोठे पंख असून शिंगासारखे दिसतात हे घुबड थोडेसे शृंघी घुबडा सारखे दिसते, डोळे पिंगट गोल असतात व चेहऱ्यावर भोवताली गोल बशी सारखा आकार असतो. हे घुबड मेळघाटात दाट जंगलात मोठे मोठे झाडोऱ्याच्या भागात पाण्याच्या अवतीभोवती दिसतो. याचे मुख्य अन्न हे लहान सस्तन प्राणी असून इतर लहान पक्षी, सरपटणारे प्राणी, बेडूक, मासे व इतर कीटक ही खाते. ह्या घुबडाचा विणीचा हंगाम हा उत्तर भारतात नोव्हेंबर ते एप्रिल तर दक्षिणेकडे डिसेंबर ते जानेवारी आहे.

हे घुबड बाकीच्या मोठ्या पक्षांनी सोडून दिलेले घरट मध्ये विन घालते मुख्यत्वे करून जेथे याला उभे राहता येते व पाण्याच्या आसपास याचे घरटे असते. मादी एका वेळेस सरासरीने दोन अंडे देते, हे जोडीने पिलांचे संगोपन करतात.






# Eastern Grass Owl

शास्त्रीय नांव : *Tyto longimembris*

लांबी : ३३ ते ४३ से.मी.




## 15 गव्हाणी गवत घुबड

हे घुबड कावळ्या पेक्षा छोटी असून दिसायला बिलकुल गव्हानी घुबडा सारखा असून स्वच्छ पांढरा चपटा हृदयाच्या आकाराचा चेहरा, तसेच डोळे काळ्या रंगाचे असतात व शरीराचा वरील भाग हा पिवळसर सोनेरी व करडी असते व त्यावर काळ्या व पांढऱ्या आऱ्या असतात. तसेच शरिराच्या खालील बाजू पांढरी ते सोनेरी असून त्यावर काळे ठिपके असतात.

डोके गोल असते व वरती बशीचा आकार असतो, हे घुबड निशाचर असून दिवसा जुन्या इमारतीत व झाडाच्या ढोलीत विश्रांती करतात. त्याचा आवाज चित्कार काढल्या सारखा येतो. हे घुबड मुख्यत्वे करून गवताळ भागात दिसून येते.






# Brown Wood Owl

शास्त्रीय नांव : *Strix leptogrammica*

लांबी : ३४ ते ४५ से.मी.






## 16 तपकिरी रान घुबड

हे घुबड कावळ्या पेळा मोठे असून हे गर्द तपकरी रंगाचे असून खांद्यावर फिक्कट पांढऱ्या रंगाचे ठिपके असतात. डोळे हे गर्द तपकिरी रंगाचे असून डोळ्यांभोवती काळ्या रंगाचे वर्तुळ असते आणि गळ्यावर पांढऱ्या रंगाची पट्टी असते. हे घुबड खूप लाजरे असून, पूर्ण पणे निशाचर आहे. ह्या घुबडाचे मुख्य अन्न हे उंदीर, चीन्चुन्द्री, लहान पक्षी, बेडूक व पाली आणि सरडे यांचा समावेश होतो.

याच्या विनीचा हंगाम हा जानेवारी ते मार्च असून मादी जुन्या झाडाच्या डोलीत व दोन फांदीच्या मध्ये एका वेळेसे सरासरीने २ अंडे देते. पिल्लांचे संगोपन नर मादी मिळून करतात. या घुबडाच्या बद्दल जास्त माहीती नाही. पूर्वी हे मेळघाटात असल्याच्या नोंदी आहेत, अलीकडच्या काळात कोणाला आढळलेला नाही.



# आभार...